महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर https://jeevandeepvarta.com मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे Rs.2/-

गुरुवार ❖ ०९ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक - १९५ ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024


## संपादकीय

### लालचौकी जवळील 'अपघात 'थांबणार कधी?

✎ रविंद्र घोडविंदे



कल्याण पश्चिमेतील लालचौकी भागात बुधवारी सकाळी भरधाव वेगात असलेल्या एका ट्रक चालकाने रस्ता ओलांडत असलेल्या महिला आणि तिच्या मुलाला चिरडले. या घटनेचं सविस्तर वृत्त दै.ठाणे जीवनदीप वार्ताच्या आजच्या अंकात प्रसिध्द झालेच आहे. अपघातांच्या बातम्या वृत्तपत्रांसाठी नव्या नाहीत, रोजच अपघात घडतात, आणि माणस दगावतात, मात्र अनेक अपघातात निरपारधाचे जेव्हा हकनाक बळी जातात तेव्हा मन हेलावत, अतीव दुःख होतं..हे अपघात कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. ग्रामीण व शहरी भागात हे प्रमाण कमी जास्त स्वरूपात आहे.या घटना कमी व्हाव्यात असे सर्वांना वाटते. पण उपाययोजना कोण करणार? लोकप्रतिनिधी आणि प्रशासनानं याकडे लक्ष देत नाही. दिले तर त्याचा एक फार्स ठरतो.

लालचौकी येथील अपघात त्यात झालेला निरपारधाचा मृत्यू ही घटना कितवी? हे प्रशासनाला ही आठवत नसेल. येथे वारंवार अपघात घडतात त्यावर कायम स्वरूपी उपाययोजना उभारण्याचे सोडाच घटना घडली तेवढयापुरती चर्चा नंतर येरे माझ्या मागल्या सुरूच. कल्याण शहर म्हणे स्मार्ट सिटी शहर या शहरातील वाहतूक कोंडी आणि दळणवळणाची समस्या येथील मोठी डोके दुःखी आहे महापालिकेत प्रशासकीय राजवट आहे. तरीही रस्ते पथपद फेरीवाल्यानी काबीज केले आहेत. अनेक रस्ते तर पथ पद विसरूनच गेले आहेत. वाहतूक पोलीस खाते फक्त खातेच आहे. मनमानी पणे वाहतूक बदल करायचा, त्यातून कोंडी कमी होण्याऐवजी वाढते आहे. पण विचारणार कोण? ढिम प्रशासन, आणि हतबल पोलीस खाते यांनी या शहरातील शिस्त वाढी पेक्षा आपल्याला तीन वर्ष आहेत मग करा सोय, आणि चला याच पद्धतीत काम सुरु केले आहे. बाजारपेठ पोलीस स्थानकाला इमरात नाही. बऱ्याच पोलीस चौक्या फक्त दिखावा, सामान्य माणूस त्रस्त. तो तरी काय करणार.ना राजकीय नेतृत्व, ना प्रशासकीय कारभारात एकसूत्रता.त्यामुळे रस्तावर नको तिथे गतिरोधक, आहेत. जिथे सिग्नल यात्रणा हवी तिथे बोजवारा हे कल्याण चे वास्तव चित्र.

लाल चौकी येथे झालेला मायलेकाचा अपघात नवा नाही याठिकाणी अनेक अपघात झालेले आहेत किंबहूना हे अपघात नित्याची घटना बनले आहे. शहरी परिसरात किंवा महापालिका हद्दीत होणारे अपघात हा चिंतेचा विषय आहे. कल्याण शहराचा विचार करता कल्याण शहरातील रस्त्यांवर स्पीड लिमिट कुठेही दिसून येत नाही त्यामुळे पालिका प्रशासन पोलीस आणि वाहतूक पोलीस यांनी याची खबरदारी घेणं गरजेचं आहे.

कल्याण शहरांमध्ये सिग्नल यंत्रणा कार्यान्वित झालेली आहे मात्र ती केवळ नावापुरती आहे असेच वाटते. खडकपाडा आधारवाडी सर्कल अशी मोजकी ठिकाणे सोडली तर शहरातल्या बहुतांश भागात कुठेही सिग्नल यंत्रणा दिसून येत नाही. दुर्गाडी चौक, लाल चौकी, स्वामी सहजानंद चौक अशा अपघात प्रवण ठिकाणी सिग्नल यंत्रणा नाही हे आश्चर्यच म्हणावे लागेल. विशेष म्हणजे या ठिकाणी वाहतुक पोलीसांची यंत्रणा देखील कुचकामी ठरते आहे.

शहरात बेधुंद अवस्थेत वाहन चालवणाऱ्या धन दांड्यांची संख्या वाढू लागली आहे. दोन आठवड्यांपूर्वी खेळांच्या स्पर्धेसाठी घेऊन निघालेल्या लहान मुलांच्या बस चालकाला मध्यधुंद अवस्थेत असताना स्थानिक नागरिक आणि पोलिसांनी जेरबंद केले होते, या आणि अशा अनेक घटना यापूर्वीही कल्याण शहरात घडलेल्या आहेत आणि पुढेही घडतच राहतील हे दुर्दैवाने म्हणावे लागेल.

शहरातल्या रस्त्यांवर अनेक ठिकाणी स्पीड ब्रेकर नाहीत झेब्रा क्रॉसिंग नाहीत वाहतूक पोलिसांची तुरळक संख्या रस्त्यांवरील खड्ड्यांचे प्रमाण विकास कामामुळे खोदलेले रस्ते अशा सगळया कारणांवर आता लक्ष देण्याची गरज आहे अपघातांच्या बाबतीत कल्याणचा रिंग रोड नेहमीच प्रकाश झोतात राहिला आहे. या घटनेनंतर तरी सुधारणा होईल का? हीच अपेक्षा....

# अपघातग्रस्तांना कॅशलेस उपचार – नितीन गडकरींची घोषणा


दै.ठाणे जीवनदीप वार्ता
□ प्रतिनिधी

केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी रस्ते अपघातातील जखमींसाठी 'कॅशलेस ट्रीटमेंट' योजना जाहीर केली आहे. या योजनेअंतर्गत केंद्र सरकारकडून जखमींचा एकूण १.५ लाखांपर्यंतचा खर्च केला जाईल. अपघात झाल्यापासून सात दिवसांपर्यंतच्या उपचाराचा खर्च सरकार करणार आहे. सध्या या योजनेवर काम केलं जात असून, मार्चपर्यंत ती अंमलात आणण्याचा प्रयत्न आहे अशी माहिती नितीन गडकरी यांनी दिली आहे. दिल्लीत नितीन गडकरींच्या नेतृत्वात सर्व राज्यातील वाहतूक मंत्र्यांची दिल्लीमधील भारत मंडपम येथे बैठक पार पडली. यावेळी ते बोलत होते. नितीन गडकरी यांनी सांगितलं आहे की, ही योजना कोणत्याही श्रेणीतील रस्त्यावर मोटार वाहनांच्या वापरामुळे होणाऱ्या सर्व अपघातांना लागू होईल. तसंच जर अपघातानंतर २४ तासांत पोलिसांना माहिती देण्यात आली तरच सरकार उपचाराचा खर्च उचलेल. तसंच हिट अँड रनमध्ये मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबीयांना २ लाखांची आर्थिक मदत दिली जाईल असंही सांगण्यात आलं आहे. राष्ट्रीय आरोग्य प्रशासन पोलीस, रुग्णालय आणि राज्य आरोग्य संस्था इत्यादींच्या समन्वयाने या योजनेची अंमलबजावणी करेल.

रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या ई-तपशीलवार अपघात अहवाल ॲप्लिकेशन आणि NHA च्या व्यवहार व्यवस्थापन प्रणालीची कार्यक्षमता एकत्रित करून, आयटी प्लॅटफॉर्मद्वारे ही योजना लागू केली जाणार आहे.

नितीन गडकरी यांनी सांगितलं आहे की, 'आम्ही कॅशलेस ट्रीटमेंट ही नवी योजना सुरु केली आहे. अपघात झाल्यानंतर २४ तासांच्या आत, जेव्हा माहिती पोलिसांपर्यंत जाईल तेव्हापासून संबंधित जखमीचा रुग्णालयातील सात दिवसांचा, १.५ लाखांपर्यंतचा उपचार खर्च केला जाईल. हिट अँड रन प्रकरणातील पीडितांच्या कुटुंबीयांना २ लाखांची मदत देऊ'. आम्ही मार्चपर्यंत नव्याने बदल करण्यात आलेली योजना आणू असं ते म्हणाले आहेत.

रस्ते सुरक्षा ही आपल्या सरकारची प्राथमिकता असल्याचं नितीन गडकरी यांनी यावेळी सांगितलं. हे सांगताना त्यांनी २०२४ मध्ये रस्ते अपघातात १ लाख ८० हजार लोकांनी जीव गमावला असल्याचं सांगितलं. यामधील ३० हजार मृत्यू हेल्मेट न घातल्याने झाल्याचंही त्यांनी सांगितलं. ६६ टक्के अपघात १८ ते ३४ वयोगटातील आहेत अशी माहिती त्यांनी दिली आहे.



## दुर्गाडी किल्ल्याच्या डागडुजीला पुढील आदेशापर्यंत मनाई



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** येथील दुर्गाडी किल्ल्या संदर्भात न्यायालयात ४८ वर्षांपासून सुरू असलेल्या दाव्यात अलीकडेच कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाने दुर्गाडी किल्ल्याची जागा ही शासनाच्या मालकीची असल्याचा निर्णय दिला होता. ही जमीन मुस्लिम समाजाचा असल्याचा दावा फेटाळून लावला होता. या निर्णयाविरुध्द मजलिस ए मुशावरीन या मुस्लिम समाजाच्या संघटनेने स्थगितीची मागणी न्यायालयाकडे केली होती. कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे जिल्हा न्यायाधीश आर. जी. वाघमारे यांनी या मागणीवर मंगळवारी दुर्गाडी किल्ला व परिसरात स्थिती जैसे थे ठेवण्याचे आदेश दिले. मुस्लिम समाजाने दाखल केलेल्या स्थगिती याचिकेवर गुरुवारी (ता.९) सुनावणी होणार आहे. त्या सुनावणीपूर्वीच मुस्लिम समाजाने तातडीचा अर्ज दाखल करून अंतिम आदेश होत नाही तोपर्यंत यापूर्वीच्या निर्णयाला स्थगिती देण्याची मागणी न्यायालयाकडे केली होती. या आदेशामुळे दुर्गाडी किल्ल्यावरील डागडुजी आणि इतर धार्मिक उपक्रम पुढील आदेशापर्यंत करण्यास मनाई करण्यात आली आहे. गुरुवारी याप्रकरणी सुनावणी होणार असल्याने हिंदू संघटनांनी न्यायालयात आपले म्हणणे मांडण्याची तयारी केली आहे.



## महापालिका आयुक्त विकास ढाकणे यांची बदली

### मंत्रालयात उप सचिवपदी नियुक्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर ।** काही महिन्यांपूर्वी महापालिका आयुक्तपदी रुजू झालेले विकास ढाकणे यांची अचानक उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपसचिवपदी नियुक्ती झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. नवीन आयुक्तपदी अंबरनाथचे मुख्याधिकारी प्रशांत रसाळ यांची वर्णी लागणार असल्याच्या चर्चेने उधाण आले आहे. उल्हासनगर महापालिका आयुक्तपदी विकास ढाकणे यांची गेल्या ऑगस्ट महिन्यात नियुक्ती झाल्यावर, त्यांनी महापालिका प्रशासनावर फक्त ४ महिन्यात चांगली पकड निर्माण केली होती. तसेच खुल्या जागेत आणि रस्त्याच्या बाजूच्या हरितपट्टा तयार करणे, अवैध बांधकामे नियमित करणे, धोकादायक इमारतीचा प्रश्न शासनकडे लावून धरून आयुक्त आणि महापौर बंगल्याला प्राधान्य दिले. नवीन महापालिका इमारतीचा आराखडा मंजूर करून घेतला, महापालिकेची स्वतःची पाणी पुरावठा योजना प्रस्तावासाठी पाठपुरावा केला. तसेच विविध विकास कामावर लक्ष केंद्रित केले होते.

मात्र विकास ढाकणे यांची उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपसचिवपदी अचानक नियुक्ती झाल्याने सर्वांना आश्चर्यचा धक्का बसला आहे. नवीन आयुक्त पदासाठी अंबरनाथ पालिकेचे प्रशासक डॉ प्रशांत रसाळ तसेच महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे.

## ठाणे जिल्ह्यातील निर्यातीला प्रोत्साहन




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे ,दि.०८ :** ठाणे जिल्ह्यातील निर्यात प्रोत्साहनासाठी ठाणे जिल्हा उद्योग केंद्र यांच्यामार्फत दि.७ जानेवारी रोजी आयोजित 'महाराष्ट्र निर्यात संमेलन २०२४-२५' जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे यशस्वीपणे संपन्न झाले. या संमेलनामध्ये २८३ हून अधिक सहभागींनी भाग घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे (भा.प्र.से.) हे होते. त्यांच्यासह उद्योग सहसंचालक, कोकण विभाग श्रीमती विजू शिरसाठ यादेखील उपस्थित होत्या.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी निर्यात क्षमता, निर्यातीतील वाढ आणि निर्यातीला चालना देण्यासाठी सीमाशुल्क विभाग, डीजीएफटी आणि विविध ईपीसी यांच्या प्रमुख भूमिकेसह निर्यातीला चालना देण्यासाठी रोड मॅपबाबत मार्गदर्शन केले. कोकण विभागाच्या उद्योग सहसंचालक श्रीमती विजू शिरसाठ यांनी ओडीओपी आणि निर्यात प्रोत्साहन, जिल्हा म्हणून निर्यात केंद्र आणि महाराष्ट्रातील विविध निर्यात उपक्रम, महाराष्ट्राचे निर्यात धोरण आणि त्यातील प्रोत्साहनांसह १० सूत्री अजेंडा आणि BRAP अंतर्गत निर्यातीतील मूळ जिल्हा याबाबत सविस्तर माहिती दिली.

जिल्हा उद्योग केंद्राच्या महाव्यवस्थापक श्रीमती सोनाली देवरे यांनी ठाणे जिल्ह्याची सद्यःस्थिती आणि निर्यात प्रोत्साहनासाठी अधिवेशनाचे महत्त्व याविषयी सुरुवातीचे भाष्य केले. तसेच सत्रादरम्यान, त्यांनी जिल्ह्याच्या ओडीओपी उपक्रम आणि डीआयसी योजना आणि जिल्ह्याच्या निर्यात कृती आराखड्यासह क्लस्टर डेव्हलपमेंट आणि राष्ट्रीय ओडीओपी पुरस्कारांची माहिती दिली.

सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांच्या निपुणतेसह त्यांच्या निर्यातीतील विभागाची भूमिका स्पष्ट केली आहे, डीजीएफटी आणि कस्टम विभागाने जिल्ह्यातील निर्यात प्रोत्साहन संभाव्य क्षेत्रे, संधी, पाळल्या जाणाऱ्या कार्यपद्धती, शिपमेंट हाताळण्याचे मार्ग, संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत वेळेवर पोहोचण्याचा दृष्टीकोन स्पष्ट केला. निर्यात संबंधित समस्या आणि एण्ड्ढ्ङ धोरणाबाबत. FIEOच्या व्यवस्थापन कार्यकारी श्रीमती रिशु मिश्रा यांनी FIEO द्वारे जिल्ह्याच्या ओडीओपीसह निर्यात प्रोत्साहनासाठी समर्थन स्पष्ट केले. अभियांत्रिकी EPC's, Chemexil EPC's ने हँडहोल्डिंग सपोर्टसह त्यांच्याद्वारे प्रदान केलेल्या विशिष्ट निर्यात क्षेत्रातील समर्थनाबद्दल स्पष्ट केले आहे इंडिया पोस्टचे मार्केटिंग एक्झिक्युटिव्ह श्री.सुंदर राव यांनी निर्यातीत भारतीय पोस्टाच्या योजनांबाबत माहिती दिली. टीजेएसबी बँकेचे एजीएम श्री.राजेंद्र तनपुरे यांनी बँकेने दिलेल्या प्री-शिपमेंट आणि पोस्ट-शिपमेंट सपोर्टबद्दल थोडक्यात माहिती दिली आहे. कार्यक्रमात यशस्वी निर्यातदारांनी त्यांचे अनुभव सर्वांसमोर कथन केल्यामुळे उपस्थितांना प्रेरणा मिळाली. जिल्हा उद्योग केंद्राच्या व्यवस्थापक श्रीमती अश्विनी कोकाटे यांनी आभार प्रदर्शन केले.

## येत्या अर्थसंकल्पात नोकरदारांना केंद्राकडून गुडन्यूज?

**सध्या नोकरी करणाऱ्या लोकांवर टॅक्स भरण्याची अधिक जबाबदारी आहे. यामागचे कारण म्हणजे त्यांचा दर महिन्याच्या पगारातून टॅक्स कापला जातो. मग त्या टॅक्सचे पैसे सरकारकडे जमा होतात. तज्ज्ञांचे असे म्हणणे आहे की, नोकरदार लोकं टॅक्स भरण्यात आघाडीवर असल्याने त्यांच्यासाठी टॅक्सचे नियम सोपे व्हायला हवेत. गेल्या काही वर्षांत महागाई झपाट्याने वाढल्याचेही तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे नोकरदार वर्गावरील टॅक्सचं ओझं कमी करण्याची गरज आहे.**




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

१० लाखांपर्यंत कमाई करणाऱ्यांसाठी महत्वाची बातमी आहे. लवकरच त्यांची टॅक्समधून सुटका होण्याची शक्यता आहे. याबाबत लवकरच केंद्र सरकारकडून मोठा निर्णय घेण्यात येणार आहे. यामुळे इनकम टॅक्सच्या ओझ्यामुळे त्रस्त असणाऱ्यांना दिलासा मिळणार आहे. याची घोषणा येत्या १ फेब्रुवारी रोजी होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारमण केंद्रीय अर्थसंकल्प २०२५ येत्या १ फेब्रुवारी रोजी सादर करणार आहेत. यावेळी त्या टॅक्स भरणाऱ्यांना मोठा दिलासा देणार आहेत. नवीन आयकर प्रणालीवर केंद्र सरकारचे जास्त लक्ष असणार आहे. नव्या आयकर प्रणालीमध्ये टॅक्स भरणाऱ्यांवर कमी टॅक्स आकारला जातो. पण त्यांना जास्त कपातीचा लाभ मिळत नाही. पण जुन्या आयकर प्रणालीमध्ये कराचे दर जास्त आहेत. पण अनेक प्रकारच्या कपाती उपलब्ध आहेत. सूत्रांचे असे म्हणणे आहे की, या वेळी अर्थसंकल्पापूर्वी सरकारने पूर्वीपेक्षा जास्त चर्चा केली आहे. सरकारने अर्थतज्ज्ञ, उद्योग प्रतिनिधी, शेतकरी संघटना इत्यादींसह विविध स्तरातील लोकांचे मत जाणून घेण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या अनेक संघटनांनी अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्याकडेही आपले मत मांडले आहे. संघाचे असे म्हणणे आहे की, १० लाख रुपयांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या करदात्यांसाठी ट्रक्स मूल्य शून्य करा. जर सरकारने जास्त रकमेच्या टॅक्स प्रकरणांवर लक्ष केंद्रित केले तर त्यांचे महसूल वाढू शकते. आता असे अनेक व्यवसाय आहेत जे टॅक्सच्या कक्षेत येऊ नयेत यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करतात. सरकारने अशा व्यवसायांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. त्यामुळे सरकारचे उत्पन्न वाढू शकते.




## लाटांवर स्वार होऊन
# विक्रम करणारी श्यामला गोली



आयुष्यात पन्नशीच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचलो की, आपण आता लवकरच म्हातारे होणार, ही भावना समस्त स्त्री-पुरुषांना त्रस्त करीत असते. त्यामुळे साहसी खेळ खेळणे किंवा खेळाशी निगडीत एखादी साहसी कृती करण्याचे स्वप्न फार कमी या वयात लोक बघतात, पण मनात जिद्द असेल तर त्यासाठी वय हे अडथळा ठरत नाही, हे ५२ वर्षीय श्यामला गोली यांच्याकडे पाहून निश्चित समजते.

श्यामला गोली यांनी अलीकडेच विशाखापट्टणम ते काकिनाडा हा दीडशे किमी अंतराचा समुद्र पट्टा पोहून पार केला. आणि एक नवीन विक्रम विस्थापित केला. २८ डिसेंबरपासून रोज ३० किमी पोहत अवघ्या पाच ते सहा दिवसांमध्ये त्यांनी आपली ही मोहिम पूर्ण केली. या प्रकारची मोहिम पूर्ण करणाऱ्या त्या पहिल्याच भारतीय महिला आहे.

श्यामला जरी पट्टीची पोहणाऱ्या असल्या तरी हे यश त्यांच्यासाठी दिसते तितके सहज नव्हते. त्यांच्या आयुष्याची कहाणी एखादया चित्रपटासारखी आहे. तेलंगणातील एका सर्वसामान्य कुटुंबात त्या वाढल्या. समाजशास्त्रात एम.ए.केल्यानंतर,पुढे ॲनिमेशनचा कोर्स करून स्वतःची ॲनिमेशन कंपनी सुरू केली. नवऱ्याच्या साथीने अल्पावधीतच त्यांनी या क्षेत्रात निर्माती आणि दिग्दर्शक म्हणून स्वतःचे स्थान निर्माण केले.

सारं काही सुरळीत सुरू असताना व्यवसायामध्ये नुकसान झाले. परिणामी त्या नैराश्याच्या गर्तेत गेल्या. या अवस्थेतून बाहेर पडण्यासाठी वयाच्या ४४ व्या वर्षी त्यांनी पोहायला सुरुवात केली. पोहता पोहता आपल्याला यात रुची आहे हे त्यांच्या लक्षात आले. पुढे २०१९ मध्ये त्यांनी पाटणा येथील खुल्या गंगा नदीच्या पात्राचे तेरा किमीचे अंतर पोहून पार केले. यानंतर त्यांचा हुरुप वाढला. पोहण्याच्या अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय मोहिमांमध्ये भाग घेऊ लागल्या. त्यामध्ये त्यांना यशही मिळाले.

यासाठी आवश्यक तो सराव करीत त्यांनी २८ डिसेंबर २०२४ मध्ये आपल्या या मोहिमेला सुरुवात केली. सारं जग नवीन वर्षाचा आनंद कसा साजरा करायचा यात गुंतले होते आणि श्यामला मात्र आपल्या ध्येयपूर्तीच्या दिशेने मार्गक्रमण करीत होत्या. या मोहिमेत त्यांच्याबरोबर चौदा जणांची टीम कार्यरत होती. त्यात डॉक्टर्स, स्कुबा ड्रायव्हर अशी अनेक मंडळी त्यांच्या सुरक्षिततेसाठी तैनात होती. समुद्रात पोहणं हे त्यांच्यासाठी खूप आव्हानात्मक होतं.

या मोहिमेतल्या अनुभवांविषयी बोलताना त्या म्हणाल्या, वाटेत येणाऱ्या डॉल्फिनबरोबर पोहताना खूप धम्माल येत होती तर कधी जेलीफिश त्रास देत होते. त्याचबरोबर लाटांचा लहरीपणा, बदलते हवामान या साऱ्या गोष्टींमध्ये पोहणाऱ्याचा अगदी कस लागला. परिस्थिती नियंत्रणा बाहेर जात आहे असं वाटत असताना, मला माझ्या योगा आणि ध्यानाचा खूप फायदा झाला. कितीही अडचणी आल्या तरी मी माझ्या ध्येयाकडे पोहचणार आहे, हा विश्वास मला मिळाला. खरोखरीच माझ्या या मोहिमा मला नुसतचं यश देत नाही, तर आयुष्याकडे अधिकाधिक सकारात्मक दृष्टीने पाहायला शिकवितात.

आज मागे वळून जेव्हा मी माझ्या आयुष्याकडे पाहते, तेव्हा जाणवते की, मी यशाचे जितके उंच शिखर बघितले आहेत तितकाच अपयशाचा तळही अनुभवला आहे. पण हे अपयश आले नसते तर मला माझ्यात दडलेले पोहण्याचे प्रेम कधी सापडलेच नसते. खरोखरीच श्यामला गोलींचा जीवनप्रवास पाहिल्यानंतर एक गोष्ट सहजपणे जाणवते की, यशस्वी होण्यासाठी वयाचे बंधन नसते. हवी असते ती फक्त दुर्दम्य इच्छाशक्ती- कोणत्याही वयात यशाला भिडण्याची.


## कल्याण डोंबिवली महानगरपालिका
### उपआयुक्त तथा नियंत्रक, अनधिकृत बांधकाम विभाग

### जाहीर सुचना

कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येत की, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रं. १५५ / २०११ मध्ये वेळोवळी दिलेल्या आदेशात सार्वजनिक / खाजगी जागेवर, इमारतींवर लावण्यात आलेले अनधिकृत जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. तातडीने काढून घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानुसार महापालिकेमार्फत अनधिकृतपणे लावण्यात आलेले अनधिकृत जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. काढण्याची कारवाई करण्यात येत असून, सर्व राजकीय पक्षांनी व नागरीकांनी त्यासाठी महापालिकेस सहकार्य करावे. याबाबत नागरिकांना तक्रार नोंदविण्याकरिता कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने खालील प्रमाणे टोल फ्रि क्रमांक उपलब्ध करून दिला आहे.

**१८०० - २३३-४३९२**

नागरिकांनी आपल्या क्षेत्रात / परिसरात कोणत्याही प्रकारचे अनधिकृत जाहिरात, होर्डिंग्ज, फ्लेक्स, बॅनर, फलक इ. लावलेले आढळल्यास अथवा नव्याने लावले जात असल्याचे निदर्शनास आल्यास वरील टोल फ्रि क्रमांकावर अथवा के.डी.एम.सी. केअर पोर्टलवर अथवा संबंधित प्रभागक्षेत्र कार्यालयात तक्रारी नोंदवावी.

अनधिकृत जाहिरात होर्डिंग, फ्लेक्स, बॅनर, फलक इत्यादी बाबत कार्यवाही करिता संबंधित प्रभागाचे सहा. आयुक्त तथा प्रभागक्षेत्र अधिकारी यांची नेमणूक करण्यात आली आहे.

तसेच तात्पुरत्या स्वरूपातील जाहिराती, बॅनर्स, पोस्टर्स लावावयाचे असल्यास त्याबाबत संबंधितांनी परवानगीसाठी संबंधित प्रभागक्षेत्र कार्यालयात अर्ज करावा.

अनधिकृत फ्लेक्स, पोस्टर्स, बॅनर, फलक इत्यादीबाबत पर्यवेक्षणाकरिता उप आयुक्त, (अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग) यांची नेमणूक करणेत आलेली आहे. तसेच अनधिकृत होर्डिंग पर्यवेक्षणाकरिता उप आयुक्त, (मालमत्ता विभाग) यांची नेमणूक करणेत आलेली आहे.

**सही /-**
**( अवधुत तावडे)**
**उप आयुक्त,**
**कल्याण डोंबिवली महानगरपालिका**
**कल्याण.**

**जा. क्र. कडोंमपा/जसंवि मुका/३८**
**दि. ०८/०१/२०२५**


## गीतासार



काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः । धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः । १-१७ ।
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते । सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्दध्मुः पृथक्पृथक । १-१८ ।

**अर्थ**

श्रेष्ठ धनुष्य धारण करणारा काशिराज, महारथी शिखंडी, धृष्टद्युम्न, राजा विराट, अजिंक्य सात्यकी, राजा द्रुपद, द्रौपदीचे पाचही पुत्र, महाबाहू सुभद्रापुत्र अभिमन्यू, या सर्वांनी, हे राजा, सर्व बाजूंनी वेगवेगळे शंख वाजविले. । १-१७, १-१८ ।

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत । नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन । १-१९ ।

**अर्थ**

आणि त्या भयानक आवाजाने आकाश व पृथ्वीला दुमदुमून टाकीत कौरवांची अर्थात आपल्या पक्षातील लोकांची छाती दडपून टाकली. । १-१९ ।

# ‘देशाचं राष्ट्रगीत वंदे मातरम हवे’
## – रामगिरी महाराजांचं वक्तव्य



धर्मगुरू रामगिरी महाराज यांनी राष्ट्रगीत आणि भारताचे महान कवी रवींद्रनाथ टागोर यांच्यावर वादग्रस्त विधान केलं आहे. त्यांच्या टीका केल्यानंतर नवा वाद सुरू झाला आहे. जन, गण, मन याऐवजी वंदे मातरम हे आपले राष्ट्रगीत असले पाहिजे, असे रामगिरी महाराज यांनी संभाजीनगरमध्ये संवाद साधताना वक्तव्य केलं होते. भविष्यात वंदे मातरम हे राष्ट्रगीत व्हावे यासाठीही आपण संघर्ष करू शकतो.

रामगिरी महाराज हे त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे चर्चेत असतात. यापूर्वीही त्यांच्या विधानांवरून वाद निर्माण झाले आहेत. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी नाशिकमधील एका कार्यक्रमात प्रेषित मोहम्मद यांच्यावर अवमानकारक वक्तव्य केले होते. त्यानंतर महाराष्ट्रात ६० हून अधिक एफआयआर दाखल करण्यात आले होते. तसेच रामगिरी महाराज म्हणाले की, रवींद्रनाथ टागोर यांनी हे गाणे ब्रिटिश राजे जॉर्ज पंचम यांच्या समर्थनार्थ गायले होते. हे राष्ट्राला उद्देशून कधीच नव्हते.

### रामगिरी महाराज कोण आहेत?

रामगिरी महाराजांना जवळून ओळखणारे रामगिरी यांचे खरे नाव सुरेश रामकृष्ण राणे असल्याचे सांगतात. त्यांचा जन्म जळगाव येथे झाला आणि त्याच परिसरात त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. १९८८ मध्ये, जेव्हा ते नववीत शिक्षण घेत असताना त्यांनी स्वाध्याय केंद्रात प्रवेश घेतला आणि पवित्र गीतेचा अभ्यास सुरू केला. दहावी पूर्ण केल्यानंतर त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील केडगाव आयटीआय कॉलेजमध्ये प्रवेश घेतला, नंतर त्यांनी अध्यात्माचा मार्ग निवडला आणि २००९ मध्ये त्यांनी नारायणगिरी महाराज यांच्याकडून दीक्षा घेतली. नारायणगिरी महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांनी सरला बेटाचे द्रष्टेपद स्वीकारले.

# भारतातील पहिली ज्वारीच्या इडलीचा कसा झाला प्रवास?



ज्वारी हे महाराष्ट्रातील रब्बी हंगामातील प्रमुख पीक आहे. राज्याच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात ज्वारीचे पीक केले जाते. पण आपल्या आहारात ज्वारीच्या भाकरीचे प्रमाण कमी आहे. ज्वारीचे आहारातील प्रमाण वाढावे यासाठी ज्वारीपासून पोहे, रवा, लाडू, चिवडा असे पदार्थ तयार केले जातातइंदापूर येथील तात्यासाहेब फडतरे आणि त्यांच्या पत्नी सरोजिनी फडतरे यांनी मिलेट्स प्रक्रिया उद्योग सुरू केला असून ज्वारीची पहिली इडली २०१२ मध्ये तयार केली होती. दरम्यान, फडतरे दाम्पत्य मागच्या १४ वर्षांपासून मिलेट्स प्रक्रिया उद्योगामध्ये काम करत असून त्यांनी ज्वारीच्या पिठापासून प्रक्रिया उद्योगाला सुरूवात केली होती. मिलेट्सचे येणाऱ्या काळातील महत्त्व लक्षात घेता त्यांनी ज्वारीवर प्रक्रिया करून विविध उत्पादने तयार करायला सुरूवात केली. लोकांना बाजारात मिळणाऱ्या इतर उत्पादनाच्या तुलनेत ज्वारीचे उत्पादनांची चव आवडत नव्हती. त्यामुळे लोकांच्या दैनंदिन आहारातील पदार्थ ज्वारीपासून बनवण्याचा त्यांनी निर्णय घेतला. नाष्टा म्हणून अनेक लोक इडलीला प्राधान्य देतात त्यामुळे ज्वारीपासून इडली बनवण्याचा त्यांनी निर्णय घेतला. त्याअगोदर हैद्राबाद येथील ज्वारी संशोधन केंद्राकडून ज्वारीपासून इडली बनवण्याचे प्रयत्न सुरू होते. पण या इडली मिक्समध्ये तांदळाचे पीठ होते. पण फडतरे यांनी केवळ ज्वारीपासून इडली मिक्स तयार केले आणि ते लोकांच्या पसंतीस उतरले. फक्त ज्वारीपासून इडली बनवण्याचा त्यांचा हा पहिलाच प्रयत्न होता. त्यांनी बनवलेली इडली ही पहिलीच ज्वारीची इडली ठरली. साधारण २०१२ साली तयार झालेल्या या उत्पादनाने आता जगभरात नाव कमावलं आहे. फडतरे यांच्या ‘गुड टू इट’ या ब्रँडखाली जवळपास ४० ते ४५ उत्पादने विक्री केले जातात. यामध्ये ज्वारीपासून इडली मिक्स, ज्वारीचा रवा, ज्वारीचे पोहे, ज्वारीचा चिवडा आणि बाजरी, नाचणी या धान्यांपासून बनवलेले विविध पदार्थांचा सामावेश आहे. जगातील ८ देशांमध्ये या विविध उत्पादनांची निर्यातही केली जाते. त्यांच्या या व्यवसायाची उलाढाल आता अडीच कोटींच्या घरात पोहोचली आहे.

# सोनू निगमचं २०२५ चं मराठमोळं पहिलं गाणं ‘चंद्रिका’



सोनू निगमने आपल्या गाण्याने देशातील प्रत्येकाच्या मनावर अधिराज्य गाजवलं आहे. सोनू निगमच्या आवाजाची जादू प्रत्येकाच्या मनावर नेहमीच पसरली आहे.अनेक भाषांमधून सोनू निगमने पार्श्वगायन केलं आहे. ते सर्वात लाडक्या गायकांपैकी एक आहेत ह्यात काहीच शंका नाही. आता पर्यंत त्यांनी भरपूर गाण्यांना आपला आवाज दिला आहे. पण यंदा नवीन वर्षाची सुरुवात सोनू निगमने एका मराठमोळ्या गाण्याने केली आहे.

होय सुबोध भावे दिग्दर्शित आणि शंकर एहसान लॉय यांनी संगीतबद्ध केलेलं, आगामी मराठी चित्रपट ‘संगीत मानापमान’ यातलं गाणं ‘चंद्रिका’ सोनू निगम ह्यांनी आपल्या सुमधुर आवाजाने गायलं आहे जे आज प्रेक्षकांच्या भेटीला आलंय.

गायक सोनू निगमने पहिल्यांदाच अशा प्रकारचं गाणं एका मराठी सिनेमासाठी गायलं आहे असं त्यांचं म्हणणं आहे. ’चंद्रिका’ या गाण्याविषयी बोलताना सोनू निगम म्हणाले ’असं गाणं मी कदाचित आतापर्यंत कोणत्याही चित्रपटासाठी गायलं नसेल, हे गाणं खूपच वेगळं आहे, हे गाणं जेव्हा मी पहिल्यांदा ऐकलं तेव्हा एका मंदिराचे वातावरण तयार झाले, परंतु हे एक डिव्होशनला सोंग नसून प्रेमाचं गीत आहे. प्रेमा मध्ये सुद्धा भक्ती आहे, मी ह्या गाण्यासाठी कुठला हि स्वार्थ ना करता स्वतःला पूर्णपणे समर्पण केलं आहे. देवाचे आभार आहेत कि मला अशा प्रकारचं गाणं गायला मिळाला. ’

जितकं सुरेख हे गाणं ऐकायला आहे तितकच सुरेख चित्रीकरण या गाण्याचं झालंय. सुबोध भावे आणि वैदेही परशुरामी ह्या दोघा कलाकारांवर हे गाणं चित्रीत केलं गेलय आणि त्यात सोनू निगमच्या आवाजाची जादू तर जणू काही स्वर्ग.

सोनू निगम ह्यांनी नाट्य संगीत बद्दल माहिती देताना सांगितलं ’मी संगीताच्या शैलीशी संबंधित आहे, म्हणूनच मी जगात शक्य तितके संगीत शिकण्याचा प्रयत्न करतो, मला माझ्या लहानपणी शास्त्रीय संगीत शिकता आले नाही. त्यामुळे जितकं होईल तितकं शिकून मी प्रेक्षकांसाठी गातो. मी भारतातील अनेक भाषांमध्ये गाणी गायली आहेत, लोकांचा विश्वास आहे की मी गाऊ शकतो, त्यामुळे मला प्रत्येक भाषा समजून घेण्याची संधी मिळाली.

स्वर्गीय लता मंगेशकर जी आणि आशा जी हे महान गीतकार आहेत तर अजय-अतुल हे सुद्धा उत्तम संगीतकार आहेत, त्या सर्वांना नाट्यसंगीताची खूप खोलवर माहित आहे. त्यामुळे त्यांच्याकाढून शिकण्यासारखं खूप काही आहे.’

इतकच नव्हे तर मराठी संगीत आणि मराठी गायक या विषयी सुद्धा सोनू निगम ह्यांनी आपला मत मांडत त्यांचा आवडता मराठी गायक कोण ह्याची माहिती दिली ते म्हणाले ’मराठी गाण्यांमध्ये खूप शोध आहे, जो कोणी संगीतकार किंवा गायक सुराला शोधून काढतो फक्त तोच एक लेजेंड बनू शकतो. मराठी संगीत तर आहेच पण त्याबरोबर मराठी लेखन हे ही एक वेगळं विश्व आहे.

मराठी गायकांबद्दल सांगितल तर बेला शेंडे, स्वप्नील बांदोडकर हे सगळे उत्तम गायक आहेत. पण तरुणांमध्ये मला आर्या आंबेकरचा आवाज खूप आवडतो, तिने चंद्रमुखी मध्ये खूप सुरेख गायलं आहे. इतर सुद्धा अनेक मराठी गायक आहेत ज्यांचा आवाज मला खूप आवडतो.’




या वेळी बोलताना सोनू निगम ह्यांनी ’संगीत मानापमान’ या चित्रपटाचे दिग्दर्शक आणि अभिनेता सुबोध भावे यांची तारीफ केली आणि त्यांच्या कामाचं कौतुक केलं. जिओ स्टुडिओज ह्यांचे सुद्धा सोनू निगम ह्यांनी आभार मानत सांगितल कि ’जिओ स्टुडिओज मराठी नेहमीच काहीतरी नवीन कन्टेन्ट प्रेक्षकांसमोर आणण्याच्या प्रयत्नात असतं जे खरोखरच प्रशंसनीय आहे.

सुंदर आवाज, सुंदर कंपोझिशन, सुंदर चित्रीकरण असल्यामुळे रसिक प्रेक्षकांकडून ह्या गाण्याला चांगलीच पसंती मिळाली आहे.

जिओ स्टुडिओज प्रस्तुत ‘संगीत मानापमान’ या चित्रपटात सूबोध भावे आणि वैदेही परशुरामी सोबत सुमित राघवन, उपेंद्र लिमये, नीना कुलकर्णी, निवेदिता सराफ, शैलेश दातार, अर्चना निपाणकर आदी कलाकार प्रमुख भूमिकेत आहेत. पटकथा आणि कथाविस्तार शिरीष गोपाळ देशपांडे आणि ऊर्जा देशपांडे यांचे आहे तर अतिरिक्त पटकथा आणि संवाद पटकथा प्राजक्त देशमुख यांनी केले आहे. जिओ स्टुडिओज प्रस्तुत, ज्योती देशपांडे आणि श्री गणेश मार्केटिंग निर्मित, सुबोध भावे दिग्दर्शित ’संगीत मानापमान’ चे म्युझिक लेबल सारेगामा आहे. ‘संगीत मानापमान’ हा संगीतमय चित्रपट १० जानेवारी २०२५ पासून आपल्या जवळच्या चित्रपटगृहात प्रेक्षकांचे मनोरंजन करण्यास सज्ज आहे.

### आरोग्य टिप्स
## आरोग्याचा खजिना



**इम्युनिटी बूस्टरः** बोरमध्ये व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात असते जे रोगप्रतिकारशक्ती मजबूत करण्यास मदत करते. हे सर्दी, खोकला यांसारख्या आजारांपासून संरक्षण करते.

**पचन सुधारतेः** बोरमध्ये फायबरचे प्रमाण जास्त असते जे पचन व्यवस्थित ठेवण्यास मदत करते. त्यामुळे बद्धकोष्ठता आणि ॲसिडिटीसारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**त्वचेसाठी फायदेशीर :** बोरमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स त्वचा निरोगी ठेवण्यास मदत करतात. यामुळे त्वचा चमकदार होते आणि सुरकुत्या कमी होतात.

**हृदयाचे आरोग्यः** बोरमध्ये असलेले पोटॅशियम रक्तदाब नियंत्रित करण्यास आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करते.

**हाडे मजबूत करतेः** बोरमध्ये कॅल्शियम आणि फॉस्फरस चांगले असते ज्यामुळे हाडे मजबूत होतात. ॲनिमियापासून बचाव करण्यास देखील मदत करते

## सुंदर त्वचेसासाठी
# बीटरूटचा करा वापर

सुंदर त्वचेसासाठी बीटरूटचा वापर ते त्वचेवर लावण्यासोबतच त्याचा ज्यूस पिणे देखील तितकेच महत्वाचे असते. बीटरुटचा ज्यूस प्यायल्याने आपली त्वचा आतून देखील सुंदर होण्यास मदत केली जाते. यासाठी बीटरूटचा वापर करताना सर्वात आधी बीटरूटचा ज्यूस पिणे आरोग्याच्या आणि त्वचेच्या सौंदर्याच्या दृष्टीने अधिक फायदेशीर ठरते. यासाठी बीटरुटचा ज्यूस करताना सर्वात आधी मिक्सरच्या भांडयात बीटरुटचे लहान लहान तुकडे करून घालावेत, त्यानंतर त्यात आपल्या आवडीनुसार आवळा, पाणी आणि आल्याचा लहानसा तुकडा व चवीनुसार मीठ घालावे. हे सगळे जिन्नस मिक्सरमध्ये वाटून बारीक करून घेऊन मग गाळणीने गाळून हा तयार ज्यूस प्यावा. लोह आणि जीवनसत्त्वांनी समृद्ध त्वचेसाठी बीटरूटचे बरेच फायदे आहेत. हे अँटीऑक्सिडंट्समध्ये समृद्ध आहे जे त्याला अँटी-एजिंग एजंट बनवते. यामुळे त्वचेचे डाग कमी होण्यास मदत होते आणि त्वचेला चमक मिळते.

बीटरुट पासून फेसमास्क आणि स्क्रब तयार करण्यासाठी सर्वात आधी एका बाऊलमध्ये तांदुळाचे पीठ, दही, बीटरूटचा रस असे सगळे जिन्नस एकत्रित मिसळून त्याची पेस्ट तयार करून घ्या. आता ही तयार पेस्ट चेहऱ्याच्या त्वचेला लावून घ्या. त्यानंतर जेव्हा हे चेहऱ्यावरचा हा फेसमास्क हलकासा वाळेल तेव्हा हलक्या हाताने मसाज करून त्वचेचे स्क्रबिंग करून घ्यावे. अशाप्रकारे आपण बीटरूटचा वापर करून त्वचेसाठी फेसमास्क आणि स्क्रब तयार करु शकता.



# कल्याणमधील अपघातात आई आणि मुलाचा मृत्यू

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ प्रतिनिधी**

कल्याणमध्ये आई आणि लहान मुलाला एका ट्रकने उडवल्याची घटना समोर आली आहे. या भीषण दुर्घटनेत आई आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. बुधवारी दुपारच्या सुमारास ही घटना घडली. कल्याणमधील लाल चौकी परिसरात हा अपघात घडला. यावेळी आई आपल्या मुलाला शाळा सुटल्यानंतर घरी घेऊन जात होती. त्यावेळी कल्याण डोंबिवली महापालिकेच्या कचरा आणि माती वाहून नेणाऱ्या ट्रकने मायलेकराला उडवले. या धडकेत आई आणि मुलाचा जागीच मृत्यू झाला. या अपघाती ट्रकचा इन्शुरन्स संपलेला होता. या घटनेमुळे कल्याणमध्ये एकच खळबळ उडाली आहे.

या अपघातानंतर पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतले आहे. महिला आपल्या मुलासह रस्ता ओलांडत असताना हा अपघात घडला. निशा सोमेसकर आणि अंश सोमेसकर असे मृत आई आणि मुलाचे नाव आहे. या अपघातानंतर स्थानिक नागरिक संतप्त झालेले पाहायला मिळाले. अपघाताची माहिती मिळताच पोलिसांना तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात ठेवली. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करुन निशा सोमेसकर आणि अंश सोमेसकर यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. सध्या पोलिसांनी ट्रक चालकाला ताब्यात घेतले असून त्याची चौकशी केली जात आहे. या अपघातामधील ट्रक कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा होता. मात्र, या अपघातानंतर महानगरपालिकेचा एकही अधिकारी याठिकाणी फिरकला नाही. याविरोधात माजी आमदार प्रकाश भोईर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी रस्त्यावर ठिय्या मांडत रास्ता रोको आंदोलन केले.

# भरधाव चारचाकीची ट्रॅक्टरला भीषण धडक

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

पालघर पालघरमधून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत भाविकांच्या कारला भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. हा अपघात इतका भीषण होता की कारचा अक्षरश चक्काचूर झाला होता.

या भीषण अपघातात तीन तरुणांचा जागीच मृत्यू झाला आहे तर चार तरुण गंभीररित्या जखमी आहेत. गुजरातच्या अंकलेश्वर भागात ही अपघाताची घटना घडली आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होतेय. मिळालेल्या माहितीनुसार, पालघरच्या मनोर भागात राहणारे साधारण ७-८ तरुण हे अजमेर शरीफ दर्गा येथे दर्शनासाठी गेले होते. त्यानंतर दर्गावरुन दर्शन घेऊ घरी परत येत असताना त्यांच्या कारला पहाटे ३ वाजता भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. पालघरच्या मनोर भागात त्यांच्या कारने एका ट्रॅक्टरला भीषण धडक दिली होती. ही धडक इतकी भीषण होती कारचा अक्षरश चक्काचूर झाला होता. दरम्यान या अपघातानंतर स्थानिकांनी लगेचच पोलिसांना या घटनेची माहिती दिली होती. त्यानंतर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी दाखल होऊन तरुणांना रुग्णालयात दाखल केले होते. या भीषण अपघातात आयान बाबा चौगले, ताहीर नासिर शेख आणि टाकवहाल येथील मुद्दत्सर अन्सार पटेल यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर चार जण गंभीररीत्या जखमी झाले आहेत. या जखमींना भरुच येथील रुग्णालयात उपचाराखातर दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती संध्या गंभीर आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होतं आहे.

या अपघातानंतर महामार्गावर वाहनांना ये-जा करण्यास अड़चण येत होती. त्यामुळे पोलिसांनी टोईंग व्हॅनने वाहन उचलून रस्ता मोकळा केला आहे. त्यामुळे प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.



## सांगोडे – वासुंद्री ग्रामपंचायत सरपंचपदी गीता पाटील बिनविरोध !

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता □ टिटवाळा**

कल्याण तालुक्यातील सांगोडे वासुंद्री ग्रामपंचायत सरपंच पदी गीता पाटील यांची बिनविरोध निवड झाली. त्यांच्या या निवडीचे आमदार किसन कथोरे यांनी तसेच दिनेश कथोरे, रवींद्र घोडविंदे, नरेश टेबे, यांनी अभिनंदन केले. गीता पाटील यांनी आपल्या सरपंच पदाच्या कार्यकाळात दोन्ही गावाच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

# राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणं बंधनकारक

## सरकारचा मोठा निर्णय, इंग्रजी शाळांवर होणार कारवाई

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

गेल्या काही वर्षांपासून अनेक इंग्रजी माध्यमांच्या तसेच विविध बोर्डाच्या शाळांकडून मराठी भाषा शिकवण्यास टाळाटाळ केली जात होती. तसेच नव्या राज्य अभ्यासक्रम आराखड्यात मराठी हा विषय पर्यायी करण्यात आल्याची चर्चा रंगली होती.

आता शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी मराठी अनिवार्यच अशी भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी शिकवणं बंधनकारक असणार आहे, अशी माहिती दादा भुसे यांनी दिली आहे. शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी शालेय शिक्षण विभागाबद्दल काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. त्यात त्यांनी शिक्षण विभागाची पुढील वाटचाल कशी असेल, त्यासाठी काय करावे लागेल याबद्दल विविध घटकांची चर्चा करत असल्याचे सांगितले आहे. शालेय शिक्षण विभागाचा रोडमॅप लवकरच तयार केला जाईल, असेही ते म्हणाले.

**शाळेतील शिक्षकांनाही मराठी भाषेचे जान असायलाच हवे**

त्यातच आता दादा भुसे यांनी मराठी शिकवणे अनिवार्य असल्याचे म्हटले आहे. 'केंद्रीय मंडळाच्या शाळांमध्ये मराठी भाषा शिकवणे अनिवार्य आहे. यातून त्यांना कोणतीही पळवाट काढता येणार नाही. याबरोबरच मराठी भाषेच्या अध्यापनाला अधिकाधिक व्यापक करण्यासाठी त्या शाळेतील शिक्षकांनाही मराठी भाषेचे ज्ञान असायलाच हवे, अशी सूचना दादा भुसे यांनी दिली आहे. दादा भुसे यांनी शालेय शिक्षण मंत्री म्हणून पदाभार स्वीकारला. यानंतर त्यांनी राज्यातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शाळा संस्थाचालक संघटना यांच्याशी चर्चा केली. या चर्चेदरम्यान त्यांनी शालेय शिक्षणाचा मोठ्या प्रमाणात विकास व्हावा, यासाठीचे सर्वंकष धोरण आणले जाणार आहे. येत्या आठ दिवसात शालेय शिक्षण विभागाच्या धोरणाचा रोड मॅप समोर आणला जाईल. शालेय शिक्षण विकासाचा एक दशसूत्री कार्यक्रम जाहीर करुन तो राबवला जाईल, असे दादा भुसे म्हणाले.



महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण समिती सभा संपन्न



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता पालघर(ऋषीकेश जाधव)**

आज दि. ०८/०१/२०२५ रोजी जिल्हास्तरीय संसर्गजन्य आजार प्रतिबंध व नियंत्रण समितीची सभा पालघर जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १२:०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय पालघर येथे आयोजित कण्यात आली होती.

सदर सभेमध्ये Humen Melapnenunovirus (HMPV) या आजाराविषयी उपाययोजना व राज्यस्तरीय मार्गदर्शक सुचना अंमलात आणण्याकरीता आढावा घेण्यात आला.

यावेळी डॉ. संतोष चौधरी सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प.पालघर, डॉ. रामदास मराड जिल्हा शल्य चिकित्सक, शशिकांत साळुंके जिल्हा सर्वेक्षण अधिकारी, डॉ. संदिप निंबाळकर सहा-संचालक कुष्ठरोग, डॉ. अजय ठाकरे साथरोग अधिकारी, डॉ. अश्विनी राव जिल्हा हिवताप अधिकारी इ. तसेच विविध विभागांचे विभाग प्रमुख / प्रतिनिधी आणि अधिकारी उपस्थित होते.

सभेमधे जिल्हाधिकारी गोविंद बोडके यांनी ICMR / WHO यांच्या सुचने प्रमाणे सार्वजनिक आरोग्य विभाग व आरोग्य विभाग जिल्हा परिषद यांच्या बरोबरीने सर्व विभागांनी प्श्ङ्क या आजारा विषयी जिल्ह्यामध्ये जनजागृती करुन नागरिकांना घाबरुन न जाता योग्य ती काळजी घेण्याचे आवाहन केले आहे.

# गारठ्यात चिमुकल्यांना राजे संस्कार प्रतिष्ठानची स्वेटररुपी उब



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे(प्रतिनिधी)**

राज्यात अनेक ठिकाणी थंडीमुळे पारा घटलेला आहे. ठाण्यात १८ - २०, तर पुण्यात ११ अंशावरून खाली सरकत आहे. अशा कडाक्याच्या थंडीत त्र्यंबकेश्वर येथील पुलाची वाडी या आदिवासी वस्तीत जाऊन चिमुकल्यांना राजे संस्कार प्रतिष्ठानने थंडीपासून बचावासाठी स्वेटर वाटप करून उब दिली आहे.

शहरी भागात थंडीची लाट कमी जाणवत असली तरी ग्रामीण भागात मात्र थंडी प्रचंड आहे. खेड्या -पाड्या, वाड्या-वस्त्यांमध्ये थंडी खूपच जाणवत आहे. कडाक्याच्या थंडीत पायपीट करत शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना खूपच त्रास सहन करावा लागत आहे आणि त्यांच्यासाठी स्वेटर मिळेल का, अशी विनंती काही शिक्षकांनी राजे संस्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. संभाजी शेळके यांच्याकडे व्यक्त केली. त्यानुसार ही मागणी रुपी विनंती स्वीकारून रविवार दि ५ जानेवारी २०२५ रोजी त्रंबकेश्वर तालुक्यामधील पुलाचीवाडी येथील आदिवासी वस्तीमधील १ ली ते ४ थी या वर्गात शिकत घेत असलेल्या ५० चिमुकल्यांना प्रा. प्राची कोळी आणि त्यांच्या मातोश्री कल्पना कोळी यांच्या हस्ते स्वेटर आणि खाऊ वाटप केले. या उपक्रमात वर्तकनगर माध्यमिक विद्यालयातील मित्रपरिवार, सार्थक सरफदार, स्नेहा सुबोध सरफदार, संजय पाटील आणि वाघ सर इ. चे सहकार्य आणि सहभाग होता.

# ठामपाच्या विद्यार्थ्यांना नेहरु तारंगण येथे सौरमंडलातील ग्रह तारेंचे ज्ञान

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता ठाणे(प्रतिनिधी)**

ठाणे महानगरपालिका ठाणे आणि मराठी विज्ञान परिषद ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने मनपा शाळांमधील विद्यार्थ्यांकरिता विज्ञान मंच गठीत करण्यात आलेला आहे. ठाणे मनपा URC 1 मधील विज्ञान मंचातील २७८ विद्यार्थी व त्यांचें ६५ शिक्षकांकरिता मंगळवार दिनांक ७ जानेवारी २०२५ रोजी नेहरू तारांगण व नेहरू विज्ञान केंद्र येथे भेट आयोजित करण्यात आलेली होती.

सदर दिवशी सकाळ सत्रात नेहरु तारांगण येथे विद्यार्थ्यांनी तारांगणाचा प्रदर्शन कक्ष येथे विविध ग्रह, तारे, उपग्रह, आणि खगोलशास्त्राशी संबंधित उपकरणे पाहत सौरमालेची रचना, कृत्रिम उपग्रह व ग्रहांवरील जीवनाबाबतची माहिती मिळाली. तसेच सर्वात आकर्षक भाग म्हणजे डोम थिएटरमधील सजीव खगोलशास्त्रीय शोध येथे तारांगणाची व्हिडिओ प्रेझेंटेशन आणि आकाशातील तारकासमूह




कसे दिसतात याचा अनुभव घेतला. हे दृश्य सर्वांसाठी अत्यंत रोमांचक होते.

दुपार सत्रात विद्यार्थ्यांनी नेहरु विज्ञान केंद्र येथे दुपारचे जेवण करून science oddesay show,3D show व SOS show बघून नेहरू विज्ञान केंद्रातील science gallery ला भेट देऊन विज्ञानातील विविध गमती जमतीद्वारे विज्ञानाचे सिद्धांत, नियम, संकल्पना यांची प्रत्यक्ष अनुभूती घेतली.

नेहरु तारांगण व नेहरू विज्ञान केंद्र भेट यशस्वी करण्यासाठी उपआयुक्त (शिक्षण) सचिन सांगळे, व शिक्षणाधिकारी कमलाकांत म्हेत्रे साहेब यांनी मार्गर्शन केले. गटाधिकारी संगिता बामणे मॅडम यांनी सदर भेटीसाठी मागील आठवड्यापासून सूक्ष्म नियोजन व मार्गदर्शन केले तसेच सदर दिवशी प्रत्यक्ष भेट दिली सोबत रविंद्र पाटील URC २ समन्वयक उपस्थित होते . यासाठी चेतन देवरे (सहाय्यक कार्यक्रम अधिकारी समग्र शिक्षा) व मुस्ताक पठाण URC 1 समन्वयक यांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून नियोजनाप्रमाणे अंमलबजावणी केली.

विद्यार्थी आरोग्यासाठी विद्यार्थ्यासोबत मनपा विभागाकडून आरोग्य पथक सोबत पाठविण्यात आलेले होते.

भेटीसाठी बसप्रमुख बस क्रं १ प्रेरणा कदम (गटप्रमुख गट क्रमांक १), बस प्रमुख बस क्रं.२ शफीक शेख (CRC) बसप्रमुख बस क्रं ३ संतोष दळवी (गटप्रमुख गट क्रमांक ३) बस प्रमुख बस क्रं ४ किरण लहमटे (CRC) , बस प्रमुख बस क्रं ५ ललिता सारंगा (गट प्रमुख गट क्रं ५) बस प्रमुख बस क्रं ६. अरुण घोडे (CRC), बस प्रमुख बस क्रं ७ उमकांत कुडे (गट प्रमुख गट क्रं ७), बस प्रमुख बस क्रं ८ सय्यद जावेद(CRC) , यांनी आपल्या बसची यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली. मुलांना त्यांच्या सुरुवातीच्या ठिकाणापासून पुर्ण भेट व परतीच्या प्रवासात संबधीत बसप्रमुख व शिक्षकांनी विशेष काळजी घेतली.सदर भेटीसाठी ठामपा परिवहन विभाग यांनी TMT बस उपलब्ध करून दिल्या. तसेच TMT च्या ८बसेसच्या बस चालकांनी नेहरू तारांगण व नेहरु विज्ञान केंद्र भेटीवेळी विदयार्थी व शिक्षक यांची सुरक्षित पणे वाहतूक करून महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# चोरीला गेलेला लाखांचा मुद्देमाल कल्याण पोलिसांनी केला परत

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

पोलीस दलाच्या स्थापनेचे औचित्य साधून २ ते ८ जानेवारी दरम्यान ठाणे शहर पोलीस अंतर्गत परिमंडळ-३ कल्याण मधील सर्व पोलिस ठाण्यांमध्ये 'पोलीस रेझिंग डे' साजरा करण्यात येत आहे. त्याच कार्यक्रमाचा एक भाग म्हणून आज कल्याणमध्ये साई नंदन हॉल याठिकाणी 'मुद्देमाल माल हस्तांतरण' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये एकूण १६२ फिर्यादींचा चोरी झालेला तब्बल १ कोटी ४३ लाखांचा मुद्देमाल कल्याण पोलिसांनी त्यांना परत दिला. यावेळी पोलीस सह आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण, अपर पोलीस आयुक्त पूर्व प्रादेशिक विभाग कल्याण संजय जाधव, पोलिस उपायुक्त अतुल झेंडे, सहायक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे यांच्यासह सर्व पोलिस स्टेशनचे वरिष्ठ




पोलिस निरीक्षक उपस्थित होते.

परत केलेल्या मुद्देमालात ३८ किमंती मुद्देमाल, ३० वाहने, ९१ मोबाईल, ६४ लाख ९५ हजार ८१० रुपये किमतीचे सोन्याचे दागिने, ४९ लाख ७१ हजार किमतीचे वाहने, १५ लाख ९३ हजार किमतीचे मोबाईल, १२ लाख ७८ हजार रोख रक्कम असा एकूण १ कोटी ४३ लाख ३७ हजार ८१० किमतीचा मुद्देमाल नागरिकांना परत करण्यात आला आहे. आपल्या हरवलेल्या वस्तू, पैसे आदी मुद्देमाल परत मिळाल्याचा मोठा आनंद या व्यक्तींच्या चेहऱ्यावर दिसत होता.

येत्या काळात महिला अत्याचार, मुलांवरील, ड्रग्ज आणि सायबर गुन्हे रोखण्यासाठी आमचे विशेष प्रयत्न असतील. यासोबतच ज्येष्ठ नागरिक आणि इतर वर्गासोबत वाढत चाललेल्या डिजिटल अरेस्टचे गुन्हे रोखण्यासाठीही उपाय योजना करणार असल्याची माहिती डॉ. सहपोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण यांनी यावेळी दिली.

# मुरबाडमध्ये वने जमिनीत विनापरवाना वृक्षतोड

## जंगल ठेकेदार व वनाधिकारी यांच्या संगनमताने वनांची बेसुमार कत्तल!



**दै.ठाणे जीवनदीप वार्ता मुरबाडी(दिलीप पवार)**

जंगले वाचविण्यासाठी शासन एकीकडे करोडो रुपये खर्च करत असताना ठाणे जिल्हातील मुरबाड तालुक्यात जंगल ठेकेदार व वनाधिकारी यांच्या संगनमताने मोठ्या प्रमाणावर अवैध वृक्षतोड सुरु आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की भुवन येथिल एका शेतकऱ्याची हरिशचंद्र बोराडे नामक जंगल ठेकेदाराने शेतकऱ्याला अंधारात ठेऊन कोणताही रितसर परवाना न घेता सर्वे नंबर २३/३ मधिल सरसकट वृक्षतोड केली असून हा सर्वे नंबर खाजगी वने असल्याचे कागदोपत्री दिसत असताना सुद्धा मोठ्या प्रमाणात जंगलतोड केली असल्याचे समोर आली आहे. याबाबत शिरवली विभागाचे वनपाल चंद्रकांत बागकर यांना मोबाईल द्वारे घटनेची माहिती दिली असता त्यांनी सदर वृक्षतोड थांबविण्यात आली असून वरिष्ठांना रिपोर्ट सादर केला असल्याचे सांगितले. तर मुरबाड पूर्वचे वनपरिक्षेत्र अधिकारी एम.जी.शिंदे यांना याबाबत विचारणा केली असता माहिती घेऊन संबंधित ठेकेदारावर कारवाई करणार असल्याचे तोंडी आश्वासन दिले असले तरी अशा प्रकारची चोरटी वृक्षतोड वनाधिकारी, वनपाल यांच्या आर्थिक हितसंबंध असल्याशिवाय होत नसल्याचे दिसत आहे. मुरबाड तालुक्यात अशा प्रकारे चारही वनपरिक्षेत्रात मोठ्या प्रमाणात विनापरवाना वृक्षतोड होत असून वनाधिकारी व जंगल ठेकेदार यांच्या आर्थिक संगनमताने बेसुमार वृक्षतोड होत असल्याची चर्चा पर्यावरण प्रेमी करत असून भविष्यात जंगले वाचली तर ही जीवसृष्टी वाचणार आहे.

# कल्याणमध्ये प्रतिबंधित औषधांसह दोन जण अटकेत



दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ कल्याण(प्रतिनिधी)

मानवी शरीरावर अपाय करणाऱ्या, सरकारने प्रतिबंधित केलेल्या औषधाच्या साठ्यासह दोन जणांना पोलीस उपायुक्तांच्या अवैध धंद्यावर कारवाई पथकाने अटक केली आहे. हे दोघेही कल्याणमधील भोईवाडा, कोनगाव मधील रहिवासी आहेत. या दोघांनी ही प्रतिबंधित औषधे आणली कोठून, ते ही औषधे कोणाला विकणार होते, या दिशेने बाजारपेठ पोलिसांनी याप्रकरणाचा तपास सुरू केला आहे.
पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या अवैध धंद्यांवर कारवाई पथकाचे हवालदार राजेंद्र सोनवणे यांच्या तक्रारीवरून बाजारपेठ पोलीस ठाण्यात या दोन इसमांविरुद्ध औषधे व सौंदर्य प्रसाधने, घातक प्रतिबंधित औषधांची विक्री कायद्याने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# नव्या पिढीला संस्कार देणे व घडविणे ही शिक्षकांची राष्ट्रीय जबाबदारी

## - आमदार संजय केळकर



दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/पेण(प्रतिनिधी)

संगणकाच्या युगात मुलांना बाहेरील ज्ञान जरी मिळत असले तरी या काळातही नव्या पिढीला संस्कार देण्याचे व त्यांना घडविण्याचे काम शिक्षक करीत आहे. यामुळे शिक्षकांची जबाबदारी वाढली असून ते काम आपले आदर्श शिक्षक करत आहेत असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभागचे संस्थापक तथा आमदार संजय केळकर यांनी पेण येथे केले.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग शाखा रायगडच्या वतीने पेणमधील रविराज फार्म हाऊस येथे आदर्श शिक्षक, आदर्श शाळा पुरस्कार व दिनदर्शिका प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्याचे उदघाट्न शिक्षक परिषदेचे संस्थापक आमदार संजय केळकर यांच्या हस्ते व जि.प. माजी अध्यक्षा नीलिमाताई पाटील, सौ.कमळाताई केळकर यांच्या उपस्थितीत करण्यात आले. कार्यक्रमास माजी जि.प.विरोधी पक्षनेते वैकुंठ पाटील, शिक्षक परिषदेचे राज्याध्यक्ष राजेश सुर्वे, राज्य नेते संजय निजापकर, ज्येष्ठ नेते नरेंद्र गुरव, नगरसेवक शोमेर पेणकर, राज्य प्रसिद्धीप्रमुख वैभव कांबळे, जिल्हा कार्यकारी अध्यक्ष भिकाजी मांढरे, उमेश महाडेश्वर, शिक्षक परिषदेचे कोकण उपाध्यक्ष सुजित बनगर, कार्याध्यक्ष संदीप शिंदे, जितेंद्र बोडके, जिल्हाध्यक्ष उदय गायकवाड आदींसह मान्यवर उपस्थित होते.

जिल्हाध्यक्ष उदय गायकवाड यांनी आपल्या प्रास्ताविकात संघटनात्मक बाबींचा उल्लेख करून शिक्षक परिषदेच्या माध्यमातून जिल्ह्यामध्ये होत असलेल्या कामाचा आढावा घेतला मागील काळात जिल्हास्तरावर केलेल्या कामाची माहिती दिली.राज्याध्यक्ष राजेश सुर्वे यांनी मनोगत व्यक्त करताना रायगड जिल्ह्यातील ग्रामीण भागातील शाळांना सीएस,आर फंडातून शाळांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात.शिक्षकांनी विद्यार्थ्यांवर नैतिक मूल्यांची अधिक प्रमाणात रुजवून करणे काळाची गरज आहे. जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नांची जिल्ह्या प्रशासनाकडून सोडवणूक न झाल्यास जिल्ह्या परिषद शिक्षण विभागा समोर आंदोलन करणार.संघटनेच्या माध्यमातून दरवर्षी गुणवंत शिक्षकांचा गुणगौरव करणारी , सामाजिक दायित्व स्वीकारत दरवर्षी रक्तदान करणारी आपली. शिक्षक संघटना जिल्ह्यात कार्यरत आहे.जुनी पेन्शन योजना लागू करणे. कॅशलेस विमा योजना- राज्यातील शिक्षकांना वैद्यकीय बिले घेण्यासाठी ज्या अडचणी येतात त्यासाठी शिक्षकांना कॅशलेस विमा योजना लागू करणे व त्याची अंमलबजावणी तात्काळ करणे. शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना लागू करणे शिक्षकांना मुख्यालयी राहण्याची अट शिथिल करण्यात यावी व कपात केलेले घर भाडे त्यांना पुन्हा परत करण्यात यावे.MSCIT अंतर्गत ज्या सेवानिवृत्त शिक्षकांची रक्कम जमा केलेली आहे ती त्यांना परत मिळावी व श्एण्ढ्ळ ला मुदतवाढ मिळावी यासाठी शिक्षक परिषद ठाम आहे असे सांगितले

याप्रसंगी माजी जि. प. अध्यक्षा नीलिमा ताई पाटील बोलताना म्हणाल्या की अतिशय दुर्गम भागात जाऊन शिक्षकवर्ग ज्ञान देण्याचे काम करत असतात अशा शिक्षकांचा गौरव करण्याचा काम शिक्षक परिषद करीत असून एक कौतुकाची थाप देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे काम होत आहे. स्वर्गीय मोहन पाटील यांनी दिलेल्या शिकवणीनुसार ज्या खुर्चीत आपण बसतो तेथे जनसामान्यांना न्याय देण्याचे काम करावयाचे आहे या शिकवणीनुसार जिल्हा परिषदमध्ये काम करीत असताना गेली अनेक वर्ष शिक्षकाच्या समस्या सोडिवण्याचे काम केले.

जिल्हा परिषद शाळांसाठी लागणारे सीएसआर फंड त्या भागातील कारखान्याकडून मिळवून देण्याचे काम नेतेमंडळी नक्की करतील असे आश्वासन यावेळी नीलिमा पाटील यांनी दिले.

यावेळी रायगड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील एक शिक्षक व शिक्षिका यांना आदर्श शिक्षक व आदर्श शाळा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जिल्हा पदाधिकारी यांच्यासह सर्व तालुक्यातील पदाधिकारी उपस्थित होते.

# इंदापूर स्थानकात मूलभूत सुविधांचा अभाव

## निवेदनात्मक मागण्यांकडे अक्षम्य दुर्लक्ष

### बहुजन क्रांती मोर्चा जिल्हा संयोजक मिलिंद साळवी यांचा प्रजासत्ताक दिनी उपोषणाचा सज्जड इशारा

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ बोरघर(विश्वास गायकवाड)

कोकण रेल्वे च्या इंदापूर स्थानकात गेल्या अनेक वर्षांपासून मूलभूत सोयी सुविधांची मोठ्या प्रमाणात वानवा दिसून येत आहे. त्यामुळे कोकण रेल्वे प्रवाश्यांची या रेल्वे स्थानकावर प्रचंड गैरसोय होते आहे. या बाबत बहुजन क्रांती मोर्चा संयोजक मिलिंद साळवी यांच्या माध्यमातून रेल्वे प्रशासनाला वारंवार लेखी निवेदने देण्यात आली. मात्र रेल्वे प्रशासन या कडे अक्षम्य दुर्लक्ष आणि कानाडोळा करत आहे. त्यामुळे बहुजन क्रांती मोर्चा संयोजक मिलिंद साळवी यांनी २६ जानेवारी अर्थात देशाच्या प्रजासत्ताक दिनी उपोषणास बसण्याचा सज्जड इशारा रेल्वे प्रशासनाला दिला आहे.

या संदर्भातील सविस्तर वृत्त असे की, १) सन २०२३ मध्ये इंदापूर रेल्वे स्थानाकावर अत्यावश्यक सुविधांच्या बाबतीत तसेच प्रवाशांना होणाऱ्या त्रासाच्या बाबतीत आपल्या कार्यालयाला दिलेली निवेदने. २) इंदापूर पंचक्रोशितील विविध ग्रामपंचायतींनी ठरवाच्या माध्यमातून रेल्वे प्रशासनाकडे केलेल्या मागण्या. ३) वेळोवेळी केलेल्या पत्रव्यवहार व विनंती अर्जाच्या उत्तरार्थ रेल्वे कार्यालयाचे प्राप्त झालेले दि. २३/१२/२०२३ रोजीचे पत्र ४) रेल्वे कार्यालयास पाठविण्यात आलेले दि. १६/०८/२०२४ रोजीचे विनंती पत्र.

५) रेल्वे कार्यालयास पाठविण्यात आलेले दि. १६/१०/२०२४ रोजीचे पत्र.६) रेल्वे कार्यालयाचे दि. १७/१२/२०२४ रोजीचे प्राप्त पत्र. उपरोक्त विषयासंर्दभात रेल्वे कार्यालयात इंदापुर रेल्वे स्थानकावार सोईसुविधा मिळण्यासाठी वारंवार निवेदन देण्यात आले आहेत शिवाय इंदापूर विभागातील ग्रामपंचायतीमधील जनतेने आणि नागरिकांनी आपल्या ग्रामसभेत ठराव करून इंदापुर स्थानकावर मुलभुत सोई सुविधा उपलब्ध करून द्याव्या अशा प्रकारे विनंती ठरावाच्या माध्यमातून आपल्याला केली आहे, परंतु आजपर्यंत कोकण रेल्वेला २५ वर्षे झाली आहेत आणि इंदापुर स्थानकावर



रेल्वेमधून उतरण्यासाठी दूतरफा प्लॅटफॉर्म नाही, प्रवाशांना रेल्वे रूळ ओलांडून पलिकडे जाणे - येण्यासाठी पादचारी पुलाची गरज असतानाही आजतगायत पादचारी पूल न उभारल्याने प्रवाशांना उभ्या असलेल्या मालगाडीच्या खालून जिव धोक्यात टाकून जावे लागत आहे, शिवाय रात्रीच्या वेळेला तर हा प्रवास म्हणजे मृत्यूची घंटा नशिबात घेउन पलिकडे यावे जावे लागते अशी गचाळ व्यवस्था आपल्या कडून केलेली असताना आपल्या इंदापुरच्या स्थानकात कोकण रेल्वेची २५ वर्षाची गौरवशाली वर्ष म्हणून फलक लावले आहे हे फार हस्यास्पद आहे.रेल्वे कार्यालयच्या दि. २३/१२/२०२३ रोजीच्या पत्रामध्ये आपल्या कार्यालयाद्वारे कळविण्यात आले होते की, प्रवाशांच्या मागण्यांचा योग्य विचार होऊन सुविधा पुरविल्या जातील. परंतु अद्याप वर्षाभरात प्रवाशांच्या सुविधेचा नव्हे तर केवळ रेल्वे प्रशासनाच्या मर्जीचा विचार झालेला दिसून येत आहे.

रेल्वे कार्यालयाच्या दि. १७/१२/२०२४ रोजीच्या पत्रामध्ये असे नमूद करण्यात आले आहे की, रेल्वे प्रशासनाद्वारे तिकीट घरापासून मुख्य महामार्गाला जोडण्यात आलेला डांबरी रस्ता तयार करण्यात आला आहे. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, हा रस्ता मुळात राष्ट्रीय महामार्गापासून विरुद्ध दिशेला असेलेल्या मुठावली तर्फे निजामपूर या गावच्या रस्त्याला जोडलेला आहे. प्रशासनाने केवळ ५०-१०० मिटीरचा रस्ता बनवून मुठवली तर्फे निजामपूरच्या रस्त्याला जोडला आहे. तसेच सदर रस्त्याद्वारे रेल्वे स्टेशनचे अंतर हे मुख्य महामार्गापासून जवळपास दिड किलोमीटर असल्यामुळे इंदापूर आणि परिसरातून येणारे प्रवासी हे रेल्वे स्थानकात रुळावर कायम उभ्या असणाऱ्या मालगाडीच्या खालून किंवा तिला वळसा घालून आपला जीव मुठीत धरून रेल्वे रूळ ओलांडत असतात. सदर पत्रामध्ये ज्या रस्त्याचा उल्लेख केलेला आहे त्या रस्त्यासाठी प्रवाशांनी कधी मागणीही केलेली नाही. याउलट पूर्वीपासून इंदापूर स्थानकात जाण्यासाठी असलेला रस्ता जो आता रेल्वे प्रशासनाद्वारे तयार करण्याचे काम चालू आहे हा प्रवाशांच्या सोयीचा आहे, त्याला जोडून पादचारी पूल उभारल्यास ते प्रवाशांच्या सोयीचे होईल. आपल्या सदर पत्रामध्ये असे नमूद केले आहे की इंदापूर रेल्वे स्थानकात २०२३-२४ या वर्षात प्रवाशांची दैनंदिन चढ उतार संख्याही केवळ २४ एवढी आहे. याचा अर्थ आपण प्रवासी संख्या २४ असल्याने प्रवाशांना आवश्यक असलेल्या सुविधा पुरविण्यामध्ये काटकसर /कुचकामीपणा करावा हे न्यायोचीत नाही. तसेच केवळ २४ प्रवासी संख्या असलेल्या स्थानकात रेल्वे प्रशासन सद्य स्थितीत करोडो रुपये खर्च करत आहे तो खर्च रेल्वे प्रशासनाच्या सोयीसाठी की, प्रवाशांच्या सोयीसाठी हा प्रश्न आता निर्माण होत आहे? जर रेल्वे प्रशासन आपल्या सोयीसाठी केवळ २४ प्रवासी संख्या असलेल्या स्थानाकात करोडो रुपये खर्च करीत असेल तर रेल्वे प्रशासनाला प्रवाशांच्या सोयीसाठी, हितासाठी इंदापूर विभागातील विविध ग्रामपंचायत, प्रवासी संघटना, सामाजिक संघटना यांनी मागणी, विनंती केलेल्या आवश्यक सुविधा सहज उपलब्ध करू शकते हे रेल्वे प्रशासनाला सहज शक्य असणारी गोष्ट आहे. त्यामुळे महोदयांना विनंती आहे की, इंदापुर स्थानकावर मुख्य मागणी आहे ती म्हणजे इंदापुर स्थानकावर पादचारी पुल, हा पुल नसल्यामुळे जनतेला रेल्वेच्या खालून वाकून जिव धोक्यात घालून जावे लागत आहे ही मुख्य मागणी दिनांक २०/०१/२०२५ पर्यंत मंजूर न केल्यास दिनांक २६/०१/२०२५ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी रेल्वेच्या स्थानकात प्रवाशांच्या न्याय्य मागण्यासाठी संविधानिक मार्गाने मी आणि माझे सहकारी ॲड. राकेश मोरे, आयु. अमरनाथ गाडे यांच्या समवेत उपोषणास बसावे लागेल यास होणाऱ्या परिणामास आपण जबाबदार रहाल याची नोंद घ्यावी असा सज्जड इशारा मिलिंद भोलीनाथ साळवी जिल्हा संयोजक बहुजन क्रांती मोर्चा व कोकण रेल्वे प्रवासी संघटना रायगड १)मिलिंद भोलीनाथ साळवी मो.न ७३८५६९५०५३ २)ॲड.राकेश चिंतामणी मोरे मो.न.७३८५८३२८६७ ३)मा.अमरनाथ आदिनाथ गाडे मो.न.९९२२५४४६४१ या बाबत ची प्रत माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादरः १)मा. देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य २) मा.आदीती तटकरे बालविकास मंत्री महाराष्ट्र राज्य तथा विभाग लोकप्रतिनीधी ४)मा.सुनिल तटकरे खासदार रायगड जिल्हा ५)मा.जिल्हाधिकारी अलिबाग रायगड ६)मा.पोलिस अधिक्षक अलिबाग रायगड ७)मा.उपविभागिय कार्यकारी अधिकारी (प्रात)माणगाव रायगड ८)मा.तहसिलदार माणगाव रायगड ९)मा.पोलिस निरिक्षक माणगाव रायगड १०) कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड बेलापुर कार्यालय मुंबई ११)प्रबंधक इंदापुर स्टेशन कोकणा रेल्वे ता. माणगाव रायगड १२)मा. प्रसिध्दी प्रमुख पत्रकार माणगाव तालुका १३)मा.सर्व लोकप्रतिनीधी इंदापुर विभाग यांना देण्यात आली आहे.

# सर्व वाहनांना फास्ट टॅगची सक्ती

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/ ठाणे(प्रतिनिधी)

राज्यातील पथकर वसुली नाक्यांवर १ एप्रिल २०२५ पासून सर्व वाहनांचा पथकर फास्ट-टॅगद्वारेच भरावा लागणार आहे. या निर्णयानुसार सध्याच्या सार्वजनिक खासगी सहभाग धोरण २०१४ मध्ये सुधारणा करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

फास्ट टॅगच्या माध्यमातून पथकर वसुली झाल्यास पथकर वसुलीत अधिक सूसुत्रता, पारदर्शकता येणार आहे. पथकर नाक्यांवर वाहनांचा खोळंबा कमी होणार आहे. यातून वेळेची, इंधनाची बचत होणार आहे. फास्ट-टॅग शिवाय अन्य कोणत्याही माध्यमातून पथकर भरायचा झाल्यास किंवा फास्ट -टॅग सुरु नसेल किंवा टॅगशिवाय वाहनाने फास्ट-टॅगच्या मार्गिकेत प्रवेश केल्यास दुप्पट पथकर भरावा लागणार आहे.राज्यात सध्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या १३ आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या ९ रस्ते प्रकल्पांवर पथकर वसुली सुरु आहे. या ठिकाणी तसेच भविष्यात पथकर वसुल करावा लागणाऱ्या प्रकल्पांसाठी हा निर्णय लागू राहणार आहे.

# जिल्हा परिषद मुरबाड शाळा नंबर दोन येथे पोलीस दिन साजरा




दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/मुरबाड(बाळासाहेब भालेराव)

ठाणे ग्रामीण पोलीस बँड पथक व मुरबाड पोलीस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दोन जानेवारी ते सात जानेवारी पोलीस दिनानिमित्त जिल्हा परिषद केंद्र शाळा मुरबाड नं २येथे बँड पथकाद्वारे राष्ट्रगीत राज्य गीत देशभक्तीपर गीते वाजवून विद्यार्थ्यांना पोलीस दलाच्या कार्यप्रणालीची माहिती देण्यात आली.
याप्रसंगी वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप गीते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी मुरबाड पोलीस ठाण्यातील पोलिस हवालदार दीपक हिंदुराव, ,पोलीस शिपाई राम काळे, दिपक गिते,यांच्यासह अनेक पोलीस कर्मचारी उपस्थित होते.
ठाणे ग्रामीण पोलीस बँड पथकाचे प्रमुख गोइंग यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम घेण्यात आला याप्रसंगी मुख्याध्यापक चिंतामण गवारी,बसंती रसाळ, भालचंद्र गोडांबे, विजय दळवी, ,जगन्नाथ शिर्के दीपक देशमुख योगेंद्र बांगर ,भारती डाबेराव, निमा म्हाडसे हे शिक्षक उपस्थित होते

# पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र तर्फे धनाजी घरत सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)

स्वर्गीय बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे वृत्तपत्र काढले होते. तो दिवस पत्रकार दिन साजरा करण्यात येतो. त्या दिनाचे औचित्य पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र यांच्या वतीने ६ जानेवारी रोजी नवीन पनवेल येथील नील हॉस्पिटल मध्ये पनवेल, उरण आणि आपल्या वृत्तपत्राचे पेण येथील पत्रकार धनाजी रामभाऊ घरत यांना शाल श्रीफळ पुष्प भेटवस्तू व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास डॉ शुभदा नील, कांदळवन अधिकारी साईश्वरी पडवळ, प्रा.डॉ भाग्यश्री







भोईर, भागवत कथाकार ज्ञानेश्वर बर्वे महाराज, भक्ती बर्वे ताई, राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित शिक्षिका मंगला गडमुळे आदी मान्यवर उपस्थित होते. दिप प्रज्वलन आणि बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक समितीचे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ अशोक म्हात्रे यांनी केले.पत्रकारांनी सकारात्मक पत्रकारिता करा असा सल्ला देऊन ज्ञानेश्वर महाराज म्हणाले की या जगातील पहिले पत्रकार नारद मुनी होते.त्यांनी योग्य ,सकारात्मक उपदेश केल्याने वाल्याचा वाल्मिकी झाला. डॉ शुभदा नील यांनी आरोग्य विषयक सल्ला दिला.योगा, मेडीटेशन करा, सॅलड खा.साखर, मैदा यापासून दूर रहा असे सांगून सर्व पत्रकारांना या परमात्म्याच्या ठिकाणी आणण्याचे काम मिलिंद खारपाटील आणि डॉ अशोक म्हात्रे यांनी केले .आणि ते पत्रकार तर आहेत मात्र ते देवदूत आहेत अशा शब्दात त्यांनी गौरव केला.अलंकार भोईर यांनी सुमधुर आवाजात भक्तिगीते गायली. अशोक घरत यांनी कविता वाचन केले.साईश्वरी पडवळ आणि प्रा. डॉ.भाग्यश्री भोईर यांनी उपस्थित पत्रकारांना पत्रकार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.यावेळी डॉ वैभव पाटील यांच्या आवाज कोकणचा या साप्ताहिकाच्या चतुर्थ वर्धापन दिना निमित्त अंकाचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी अनिल कुरघोडे,संजय कदम,दीपक घोसाळकर,निलेश म्हात्रे,मयूर तांबडे,सुधीर पाटील,सुनील कटेकर,धनाजी घरत,जगदीश भोईर, रणीता ठाकूर,सुजाता होळकर या पत्रकारांना बाळशास्त्री जांभेकर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पत्रकारांच्या वतीने दिपक घोसाळकर आणि रणीता ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले. नील हॉस्पिटल कडून पत्रकारांना शिवसंदेश ,सत्यनारायण कथा ही पुस्तके आणि लक्ष्मी ची फ्रेम देण्यात आली.या कार्यक्रमास पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्र चे सदस्य, महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

# कोळसेवाडी पोलिसांची विद्यार्थ्यांमध्ये सायबर जनजागृती



दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)

पोलीस रेझिंग डे निमित्ताने कोळसेवाडी पोलीस स्टेशन हद्दिमध्ये मॉडेल इंग्लिश स्कूल, कोळसेवाडी मार्केट कल्याण पूर्व येथे सायबर जनजागृती तसेच महिला सुरक्षा याबाबत विद्यार्थ्यांशी संवाद साधून जनजागृती करण्यात आली. यावेळी सायबर जनजागृती विषयक मार्गदर्शन केले. गुड टच, ब्याड टच तसेच सोशल मीडियाचा वापर आणि विना परवाना ड्रायव्हिंग याविषयी मार्गदर्शन केले. यावेळी सुमारे ७० ते ७५ विद्यार्थी व ४ शिक्षक उपस्थित असल्याची माहिती कोळशेवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक कदम यांनी दिली.

# पत्रकारांचा सन्मान म्हणजे निर्भीडतेचा आणि लोकशाहीचा सन्मान-डॉ. आमोद ठक्कर

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)

रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर कॉलेज, महालण विभाग, फुंडे येथे राष्ट्रीय पत्रकार दिन समारंभ मोठ्या उत्साहात साजरा झाला. मराठी विभाग व ग्रंथालय विभाग यांच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात उरण पत्रकार संघातील सर्व पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर होते, आपल्या मनोगतात ते म्हणाले की, 'पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. पत्रकार आपल्या लेखणीतून



समकालीन घडामोडी मांडत असतात, प्रसंगी त्यावर भाष्य करतात, आणि प्रस्थापित राजकारणाला आणि समाजकारणाला वेगळी दिशा देवू शकतात. लोकशाहीमध्ये सर्व सामान्य माणसांचा विश्वास डळमळीत होणार नाही याची दक्षता फक्त पत्रकारच घेत असतात, त्यामुळे पत्रकारांचा सन्मान हा खऱ्या अर्थाने लोकशाहीचा सन्मान असतो'.या समारंभाच्या निमित्ताने उरण तालुक्यातील अनेक पत्रकार उपस्थित होते, महाविद्यालयाने आयोजित केलेल्या या सत्काराला उत्तर देताना जगदीश तांडेल, प्रदीप पाटील व अजित पाटील यांनी आपले मनोगत व्यक्त केले. वृत्तपत्र का वाचावे ? कसे वाचावे ? मुद्रित माध्यम व डिजिटल मिडिया यामध्ये नेमका काय फरक आहे यावर जगदीश तांडेल यांनी विस्तृत भाष्य केले. या समारंभास आवाज महामुंबई चॅनेलचे संपादक मिलिंद खारपाटील, पत्रकार, सुर्यकांत म्हात्रे, महेश भोईर,राजकुमार भगत, जीवन केणी, . पंकज ठाकूर, दिनेश पवार, कु. आरती सुरवसे हे पत्रकार उपस्थित होते, महा विद्यालयाच्या वतीने सर्वांना सन्मानचिन्हे, लेखणी, दैनंदिनी व गुलाबपुष्प देवून सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख प्रा. गजानन चव्हाण यांनी केले, आभार प्रदर्शन ग्रंथपाल सुप्रिया नवले यांनी केले तर या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. चिंतामण धिंदळे यांनी केले.

## स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त

# युवकांसाठी उद्योजकता प्रेरणा कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)

१२ जानेवारी हा दिवस स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त राष्ट्रीय युवा दिन म्हणून संपूर्ण राष्ट्रामध्ये साजरा करण्यात येतो. त्यानुषंगाने युवकांच्या विविध गुणांना तसेच कौशल्यांना वाव व प्रोत्साहन मिळावे यासाठी वीर मुरारबाजी देशपांडे, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, महाड येथे १२ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता युवकांसाठी उद्योजकता प्रेरणा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.
या कार्यक्रमासाठी मान्यवर व्यक्ती तसेच मार्गदर्शन करण्यासाठी यशस्वी उद्योजक आणि व्याख्याते उपस्थित राहणार आहेत, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून उत्तीर्ण झालेल्या माजी प्रशिक्षणार्थी व त्यांचे पालक यांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित, रहावे असे आवाहन संस्थेचे प्राचार्य एन. एस. पुरकर यांनी केले आहे

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी